# मिरा भाईंदर महानगरपालिका
# मा. महासभा दि. १९/१०/२०१८

**प्रकरण क्र. ८६ :-** **महापालिका क्षेत्रात साजरे करण्यात येणारे सण/उत्सवाकरिता बांधण्यात येणाऱ्या मंडपाजवळ जाहिरात फलक, बॅनर्स यांना परवानगी देणेबाबत.**

**ठराव क्र.** ८७ :-

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात बोर्ड/ बॅनर इ. जाहिरातींमुळे शहराचे विद्रुपीकरण थांबविणेसाठी मा.महासभा दि.०५/०९/२०१८ ठराव क्र.७२ अन्वये अधिकृत होर्डिंग्ज, कॅन्टीलीवर, कमानी व्यतिरीक्त जाहिरात करण्यास मनाई करण्यांत आलेली आहे.

तथापी शहरातील सार्वजनिक जागेवर सर्वधर्मीयांमार्फत साजरे करण्यात येणारे सण / उत्सवा निमित्त परवानगी घेऊन बांधण्यात येणाऱ्या मंडपाच्या शेजारी जाहिरातीचे फलक, बॅनर्ससाठी परवानगीची मागणी करण्यात येत आहे.

याअनुषंगाने मा.आयुक्त सो. यांचेकडे दि.०८/१०/२०१८ अन्वये टिपणी सादर करण्यांत आलेली आहे. सदर टिपणीस मान्यता देऊन मा.आयुक्त सो. यांनी मा.महापौर महोदया यांचे अध्यक्षतेखाली मा.पदाधिकारी व गटनेते यांची बैठक बोलविण्याकामी सुचविले होते. याअनुषागाने आज दि. ११/१०/२०१८ रोजी ठिक १२.०० वा. महानगरपालिकेच्या लाल बहादुर शास्त्री सभागृहात, (स्थायी समिती ) मा.महापौर महोदया यांचे अध्यक्षेतेखाली बैठक बोलविण्यांत आली होती. सदर बैठकीत महानगरपालिकेचे सर्व प्रभाग अधिकारी, विभागप्रमुख अतिक्रमण विभाग तसेच सर्व राजकिय पक्षाचे गटनेते उपस्थित होते.

सदर बैठकीत विषयांकीत प्रकरणी साधक बोधक चर्चा होवून महानगरपालिका क्षेत्रात साजरा होणाऱ्या सर्वधर्मिय उत्सवासाठी, प्रदर्शने इ. सामाजिक व शैक्षणीक कार्यक्रम व उपक्रमांसाठी मंडपाला लागुन रस्त्यावरुन दिसणाऱ्या दर्शनी भागापूरतीच संबंधित मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २४४ व २४५ नुसार व मुंबई प्रांतिक महानगरपालिका (जाहिरात व फलक नियंत्रण) नियम २००३ च्या अधिन राहून एका बॅनर/कटआउट साठी मा.स्थायी समिती सभा दि.२९/०२/२००८ ठराव क्र.४३ अन्वये व मा.महासभा दि.१९/०३/२००८ ठराव क्र.३५ अन्वये निश्चित केलेल्या दराप्रमाणे जाहिरात फी वसुल करुन परवानगी देण्यांत यावी असे मा.महापौर यांनी घेतलेल्या बैठकीत निश्चित करण्यांत आले. सदर सुचनेनुसार मा.महासभा दि. ०५/०९/२०१८ ठराव क्र.७२ अन्वये ठरविण्यांत आलेल्या जाहिरातच्या धोरणामध्ये फेरबदल करणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील अनुसुची 'ड' प्रकरण क्र.२ मधील नियम 'र' नुसार पारीत केलेल्या ठरावात फेरबदल करता येण्याची तरतुद आहे.

सदर तरतुदीच्या अधिन राहून मा.महासभा दि०५/०९/२०१८ ठराव क्र. ७२ मध्ये ठरविण्यांत आलेल्या जाहिरातीच्या धोरणामध्ये फेरबदल करण्यासाठी शिफारस आहे.

**ठराव क्र. :-**

शहरात महापालिकेचे जाहिराती बाबतचे दर यापूर्वीच निश्चित केलेले आहेत. त्या नियमानूसार यापूढे खालीलप्रमाणे जाहिराती लावणेकरीता परवानगी देण्यात यावी.

१) मिरा भाईंदर शहरात होणाऱ्या सार्वजनिक जागेवर धार्मिक, सांस्कृतिक, सामाजिक व क्रिडा विषयक कार्यक्रम महापालिकेने तात्पुरत्या स्वरुपात जाहिरात लावण्यास परवानगी देण्यात यावी.

२) सदर कार्यक्रमाच्या निश्चित केलेल्या एक दिवस अगोदर, कार्यक्रमादिवशी व कार्यक्रमाच्या एक दिवसानंतर जाहिरात लावण्यास परवानगी देण्यात यावी.

३) कार्यक्रमाच्या प्रवेशद्वाराजवळ एकच बॅनर किंवा एकच कमान लावण्यास परवानगी देण्यात यावी.

४) सदर जाहिरातीवर महापालिकेने निश्चित केलेल्या दराप्रमाणे आकारणी करण्यात यावी.

५) तसेच आरक्षित जागेवर कार्यक्रमास परवानगी दिल्यास त्यांचेकडून फक्त दर्शनी भागात जाहिरात लावण्यास परवानगी देण्यांत यावी व त्यांचेकडून निश्चित केलेल्या दराप्रमाणे फी भरण्यात यावी. तसेच कार्यक्रमाच्या आतील भागात जाहिरात केल्यास त्याच्यावर जाहिरात कर लावण्यात येवू नये.

६) एखादा सार्वजनिक हिताचा खाजगी कार्यक्रम हाती घेतल्यास त्याला वरील अटीशर्तीवर परवानगी देण्यात यावी. तसेच सदर कार्यक्रमाचा दिशादर्शक व अतिमहत्वाचे व्यक्ती येणार असल्यास विशेष बाब म्हणून मा. आयुक्त यांनी त्यांचे अधिकारात सदर कार्यक्रमाला परवानगी देण्यात यावी.

७) कार्यक्रमाचे विनापरवानगी जाहिरात केल्यास प्रती बॅनर वर रु.१०,०००/- दंडाची आकारणी करण्यात यावी तसेच सदर व्यक्तीने, संस्थेने दुसऱ्यांदा विनापरवानगी जाहिरात केल्यास त्यावर देखील दंडाची कारवाई त्याच दराने करण्यात यावी व तिसऱ्यांदा विनापरवानगी जाहिरात केल्यास त्याचे विरुध्द दंड व कायदेशीर गुन्हा दाखल करण्यात यावा.

८) शहरात सार्वजनिक जागा, भिंती यावर स्टिकर लावणे, रंगकाम करणे यावर देखील दंडात्मक कारवाई करण्यात यावी. तसेच सार्वजनिक भिंती रंगविणे, स्टीकर लावणे याकरीता परवानगी देण्यात येवू नये.

९) खाजगी वाहने, रीक्षा या माध्यमातून जाहिरात होत असतील तर त्यावर मंजुर दराप्रमाणे जाहिरात कर आकारणी करून फी वसुल करणे बंधनकारक राहिल.

१०) शाळा, कॉलेज, कंपनीची खाजगी वाहने यांना जाहिराती मधून वगळण्यात येत आहे.

११) खाजगी जागेत होर्डींग्ज, बॅनर, फलक लावले असतील त्यांना हे नियम लागू होणार नाहीत. मात्र रस्त्याच्या बाजूला दर्शनी भागात जाहिरात केल्यास त्याला जाहिरात फी लागू होईल.

१२) खाजगी संकुलने, खाजगी जागा यामधील जाहिरातींना कोणतीही परवानगी घेण्याची आवश्यकता नाही मात्र रोडच्या दर्शनी बाजूला जाहिरात केल्यास त्यांना जाहिरात फी लागू होईल.

१३) जी खाजगी आरक्षणे, आरक्षित उद्याने महापालिकेच्या ताब्यात असतील व त्यांच्या सोयी सुविधा महापालिका पुरवित असेल व ती खाजगी संकुले असतील तरी त्यांना जाहिरात दर लागु होणार.

१४) कार्यक्रमाच्या मुख्य प्रवेशद्वारावर रस्ता सोडून कार्यक्रमाच्या प्रवेशद्वारावर नियमानूसार कमानीची परवानगी देण्यात यावी.

१५) वरील जाहिरातीचे धोरण प्रामाणिक व कडक अंमलबजावणी करण्यासाठी महानगरपालिकेस मनुष्य बळ कमी पडणार आहे. त्यासाठी मा. आयुक्त यांनी साधन सामुग्री मनुष्यबळासह निविदा काढावी तसेच मा. आयुक्त यांनी दंडात्मक रक्कम वसुल झालेल्या रक्कमेतून ठेकेदारास ५० टक्के रक्कम प्रोत्साहनार्थ (इंन्सेटीव्ह) देण्यात येईल अशा प्रकारे ३ वर्षाकरीता निविदा काढण्यात यावी.

१६) नागरीकांच्या व लोकप्रतिनिधींच्या तक्रारी ठेकेदारास प्राप्त झाल्यावर त्यांनी त्यांचेवर कारवाई न केल्यास त्यांचेवर देखील दंडात्मक कारवाई करण्यात यावी.

१७) वरील सर्व अटीशर्तीचे कठोरपणे कारवाई करावी.

**सुचक :- श्री. प्रशांत दळवी** **अनुमोदक :- श्री. मनोज रामनारायण दुबे**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | मेहता डिंपल विनोद | १ | भोईर राजू यशवंत | १.जैन गीता भरत |
| २ | वैती चंद्रकांत सिताराम | २ | आमगावकर हरिश्चंद्र रामचंद्र | |
| ३ | पाटील रोहिदास शंकर | ३ | पाटील प्रविण मोरेश्वर | |
| ४ | पाटील धृवकिशोर मन्साराम | ४ | परेरा कॅटलीन एन्थोनी | |
| ५ | पाटील प्रभात प्रकाश | ५ | नलावडे दिनेश दगडु | |
| ६ | सिंह मदन उदितनारायण | ६ | शिर्के अनंत गेणू | |
| ७ | भानुशाली वर्षा गिरधर | ७ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | |
| ८ | यादव मिरादेवी रामलाल | ८ | मेहरा राजीव ओमप्रकाश | |
| ९ | हसनाळे ज्योत्स्ना जालिंदर | ९ | सावंत अनिल दिवाकर | |
| १० | गोहिल शानू जोरावर सिंह | १० | इनामदार जुबेर अब्दुल्ला | |
| ११ | डॉ. पाटील प्रिती जयप्रकाश | ११ | पाटील जयंतीलाल गुरुनाथ | |
| १२ | सोंस निला बर्नाड | १२ | घरत तारा विनायक | |
| १३ | रावल मेघना दिपक | १३ | कदम अर्चना अरुण | |
| १४ | मोकाशी दिपाली आनंदराव | १४ | पांडे स्नेहा शैलेश | |
| १५ | जैन सुनिता रमेश | १५ | गोविंद हेलन जॉर्जी | |
| १६ | अरोरा दीपिका पंकज | १६ | गुप्ता कुसुम संतोष | |
| १७ | नाईक विविता विवेक | १७ | भोईर भावना राजू | |
| १८ | भावसार वंदना संजय | १८ | शेख रुबीना फिरोझ | |
| १९ | बेलानी हेमा राजेश | १९ | डिसा मर्लिन मर्विन | |
| २० | भोईर विणा सुर्यकांत | २० | परदेशी गिता हरीश | |
| २१ | सोनार सुरेखा प्रकाश | २१ | पाटील नरेश तुकाराम | |
| २२ | शिंदे रुपाली वसंत (मोदी) | २२ | पाटील वंदना विकास | |
| २३ | शाह राकेश रतिशचंद्र | २३ | पाटील संध्या प्रफुल्ल | |
| २४ | शेट्टी अरविंद आनंद | २४ | अहमद साराह अकरम | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २५ | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | २५ | बगाजी शर्मिला विन्सन्ट | |
| २६ | तिवारी अशोक सूर्यदेव | २६ | बांड्या एलायस दुमिंग | |
| २७ | भूप्ताणी रक्षा सतीश (शाह) | | | |
| २८ | शाह सीमाबेन कमलेश | | | |
| २९ | रकवी वैशाली गजेंद्र | | | |
| ३० | कांगणे मीना यशवंत | | | |
| ३१ | परमार हेतल रतिलाल | | | |
| ३२ | दळवी प्रशांत ज्ञानदेव | | | |
| ३३ | म्हात्रे नयना गजानन | | | |
| ३४ | भोईर जयेश भानुदास | | | |
| ३५ | थेराडे संजय अनंत | | | |
| ३६ | विराणी अनिल रावजीभाई | | | |
| ३७ | जैन दिनेश तेजराज | | | |
| ३८ | गजरे दौलत तुकाराम | | | |
| ३९ | मांजरेकर आनंद दत्ताराम | | | |
| ४० | कासोदारिया अश्विन शामजीभाई | | | |
| ४१ | दुबे मनोज रामनारायण | | | |
| ४२ | व्यास रवि वासुदेव | | | |
| ४३ | खंडेलवाल सुरेश जगदीश | | | |
| ४४ | पांडेय पंकज सूर्यमणि | | | |
| ४५ | भोईर गणेश गजानन | | | |
| ४६ | पारधी सुजाता यशवंत | | | |

ठराव बहुमताने मंजूर

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका